संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# जनतेच्या कौलाचा सन्मान राखणार का

महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच जनतेने वेगळ्या स्वरूपाचा कौल दिला आहे. दोन्ही काँग्रेसला ४०-५० जागांच्या आत बंदिस्त करून प्रथमच विरोधी पक्षाला जनतेने सत्तेची संधी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना आणि भाजपा या दोघांमध्ये मंत्रीपदाच्या वाटपावरून मतभेद सुरू आहेत. विश्वासदर्शक ठरावाच्या आधी मंत्रिमंडळाचा विस्तार करून शिवसेनेला विश्वासात घेतले जाणे अधिक महत्त्वाचे ठरते. कारण यामधून जनतेने महाराष्ट्रावर दाखवलेल्या विवासाचा आदर केल्यासारखे होऊ शकते या नव्या राजकीय वातावरणात जनतेचा आदर हा सर्वांत महत्त्वाचा ठरतो. आपल्याला सर्वाधिक जागा मिळाल्या अशा तोऱ्यात भारतीय जनता पार्टी असली तरी राज्यांच्या स्थिर सरकारचा विचार केला तर सेना-भाजपाचे एकत्र येणे ही काळाची गरज ठरते. आतापर्यंत मित्र असलेल्या शिवसेनेचा आदर ठेवून भाजपाने आपला राजकीय सभ्यपणा दाखविला पाहिजे. ज्याप्रमाणे केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांनी शक्य तो सगळ्या पक्षांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे, अशावेळी महाराष्ट्रात या दोन्ही पक्षांनी काँग्रेस विरोधात भक्कम सरकार द्यावे अशी जनतेची अपेक्षा आहे. सध्याचे राजकीय वातावरण ते काँग्रेसी पध्दतीचे नाही. त्यामुळे खातेवाटप किंवा मंत्रीपदे यासाठी सन्मानजनक तोडगा निघू शकेल. परंतु याही पलिकडे जाऊन सत्तेच्या राजकारणापेक्षाही विकासाचे राजकारण असा मोठा बदल राजकीय वातावरणामध्ये घडून आला आहे. जनतेने महाराष्ट्रात दिलेल्या परिवर्तन कौलाचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे. भाजपा आणि सेना या दोघांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या आणि दोन्ही काँग्रेसपेक्षा या दोन्ही पक्षांना जनतेने आपला कौल दिला आहे. म्हणजेच निवडणुकीनंतरसुध्दा या दोघांनी एकत्र येऊन राज्याला स्थिर आणि भक्कम सरकार द्यावे असाच त्याचा अर्थ निघतो. आपल्याला जास्त जागा मिळाल्या आहेत असा अभिमान भाजपाला वाटू शकतो, परंतु या जागांच्या संख्येपेक्षा जनतेचा सांगावा काय आहे याचा भाजपाने विचार करावा. जनतेचे परिवर्तनाचे ध्येय सिध्द करायचे असेल तर स्वाभिमान बाजूला ठेवून राज्याच्या विकासाचे भान बाळगले पाहिजे. हे काम शिवसेनेला सन्मानाने बरोबर घेऊनच होऊ शकते. अनेक वर्षांनंतर जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याची संधी मिळाली आहे त्याचा अपमान होऊ नये.

### पवारांचे कुरघोडीचे राजकारण

आतापर्यंतचे राजकारण हे काँग्रेसी पध्दतीने होत आले. जनतेला दिलासा देण्यापेक्षा सत्ता ओरबडण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची कारस्थाने केली गेली. आता महाराष्ट्रातसुध्दा शरद पवारांनी चालवलेली खेळी ही केवळ राजकीय कुरघोडी दाखवणारी ठरते. दोन्ही काँग्रेस आज अशा काही अडचणीच्या परिस्थितीत आहे की, त्यांना निदान ५ वर्षे तरी सत्तेपासून दूर राहावे लागेल. त्या नेत्यांना सत्तेपासून दूर राहण्याची सवय नाही ही घालमेल आणि तगमग शरद पवार लपवू शकत नाहीत. आपल्या पक्षातील काही नेते सेना भाजपाच्या गळाला लागू शकतात याची पूर्ण जाणीव असल्यामुळे त्यांनी न मागता भाजपाला समर्थन देऊ केले. राज्यात अस्थिरता येणार नाही असे सांगून विवासदर्शक ठरावाच्यावेळी आपले आमदार आपल्याच ताब्यात राहतील याची काळजी घेतली. म्हणूनच त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अनुपस्थित राहतील अशी धूर्त खेळी पवार खेळले आहेत. परंतु त्यांच्या या कुरघोडीच्या राजकारणाकडे लक्ष न देता भाजपा-सेनेने आपल्या एकत्र येण्याची संधी योग्य पध्दतीने साधायला हवी. येणाऱ्या प्रत्येक राजकीय घटनेकडे शरद पवार नजर ठेवून आहेत. फक्त त्यांच्याकडे आता आपला पक्ष एकत्रित कसा राहिल हेच मोठे आव्हान आहे. त्यांनी भलेही पाठिंबा दिला असला तरी तो बेभरोशाचा आणि अनावश्यकही ठरतो. कारण ज्यांना जनतेने नाकारले आहे त्यांच्या पाठिंब्याची अपेक्षाही ठेवता येत नाही आणि तशी आताच्या परिस्थितीत गरजही उरत नाही, या देशाने काँग्रेसचे राजकारण अनेक वर्षे अनुभवले. परंतु त्यातून सामान्य माणसाच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. आणि आता हा खेळ चार दिवस चालू ठेवणे देशाला परवडणारे नव्हते. लोकांमध्ये निर्माण झालेली बदल घडवण्याची तीव्र इच्छा ही फार महत्त्वाची ठरते. लोकशाहीत जर लोकमताला महत्त्व असेल तर मग या लोकमताचा आदर करण्याची प्रगल्भता व्यक्त झाली पाहिजे. राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी अधिकाधिक करून घेण्याची नव्याने सुरुवात झाली पाहिजे.

### परिवर्तनाचे प्रतिनिधी व्हा

ही सर्व राजकीय परिस्थिती लक्षात घेतली तर जनतेच्या विकासाच्या कौलाचा सन्मान ठेवणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. आज सगळ्या देशभर केवळ राजकारणातच नव्हे तर सगळ्याच क्षेत्रामध्ये परिवर्तनाचे वारे वाहत आहेत. लोकांना विकासकामामध्ये वेग हवा आहे. सरकारी कारभारामध्ये आधुनिकता हवी आहे. परंपरागत पध्दतीने सत्तेच्या भोवती खेळणारे राजकारण जनतेला नको आहे. जो गतीमान विकासाची ग्वाही देईल त्याच्या बाजूने लोक आपला कौल देत आहेत. आणि या परिवर्तनाचे प्रतिनिधी व्हायचे असेल तर सत्तेपेक्षाही विकासाच्या राजकारणाचा ध्यास घेतला गेला पाहिजे. महाराष्ट्राने ती संधी राजकीय पक्षांना दिली आहे. काँग्रेसला नाकारून त्यांनी विकासाला दिलेला होकार तितक्याच समजूतदारपणे लक्षात घ्यायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची निर्मिती करताना लोकशाही ही सामान्यांचे प्रतिनिधीत्व करणारे माध्यम असले पाहिजे. ज्या दिवशी सामान्यांच्या हिताकडे दुर्लक्ष होईल त्यादिवशी लोकशाही निरूपयोगी ठरली असे म्हणावे लागेल, असा स्पष्ट इशारा बाबासाहेबांनी दिला होता. जनमत, लोकमत हेच लोकशाहीचे आधार आहेत.आणि तो आवाज बुलंद ठेवण्यासाठी या जनमताचा सन्मान काळाच्या कसोटीवरसुध्दा वारंवार अधोरेखित झाला पाहिजे. मूळ उद्दीष्टाकडे दुर्लक्ष करण्याचे काम गेल्या पन्नास-साठ वर्षांमध्ये झाले. लोकशाहीचा मूठभर लोकांनी स्वार्थासाठी वापर करून घेतला. हे आता थांबणे गरजेचे आहे. निदान या नव्या राजकीय अभिसरणाला महाराष्ट्रातून सुरुवात व्हायला हरकत नाही.